# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 19/03/2016 (का.प.क्र.14) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक 19 मार्च 2016 रोजी (16-03-16 ची तहकूब सभा-का.प.क्र .14) मा.सभापती श्री.दिलीप गंगाधर थोरात यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची (अर्थसंकल्पीय)सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 11-30 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया आयएएस, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
13. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
14. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
15. स.स.श्रीमती रेश्मा अशफाक कुरैशी

मा.सभापती :मागिल तहकूब करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय सभेस सुरूवात करण्यात येते.

श्री.रावसाहेब आमले : बजेट सादर केले यात ठराविक वार्डासाठी जास्तीत जास्त निधी ठेवलेला आहे.ज्या वार्डाचा विकासच झाला नाही अशा वार्डातील कामे कमी केली हा अधिकार अधिकारी यांना दिला कुणी स्थायी समितीला विश्वासात घेतले नाही.माझ्या वार्डासाठी 70 लक्ष निधी कमी केला आहे.

श्रीमती समीना शेख : सर्व वार्डासाठी समान निधी दिला पाहिजे यात मोठी तफावत दिसून येते एका वार्डासाठी 20-30 लक्ष तर दुसरे काही वार्डासाठी 1, दीड ते अडीच कोटी तरतूद केली . उदा. 106 वार्डसाठी 2.40 कोटी तर 107 साठी 1.50 कोटी दिले या वार्डासाठी एवढी विशेष सहानुभूती का जुन्या भागातील वार्डाच्या विकासासाठी तरतुदीत वाढ करावी.

श्री.नितीन चित्ते : मागिल वेळेस आमच्या वार्डात तरतूद कमी दिलेली होती. 9 महिण्याचा अनुभव आला 15-20 लक्ष एका वार्डासाठी दिले तीही कामे केली नाही काम होत नाही आश्वासन दिले जाते. मा.सभापती हे सभ्य व शांत स्वभावाचे असल्याने लेखा विभागाने याचा गैरफायदा घेतला 9 महिण्यात विकासाचे एकही काम झाले नाही एखादया वार्डात काम का होत नाही तर तरतुद नाही असे सांगितले जाते बजेट करतांना या समितीला विश्वासात घेतले नाही केलेल्या तरतूदी संयुक्तीक वाटत

नाही. आदर्श रस्त्यासाठी 6 कोटीची तरतूद केली यात किती रस्ते होणार आहे सहा झोन आहे एक कोटीमध्ये किती मीटर रस्त्याचे काम होते.

श्रीमती समीना शेख : 9 झोन होणार आहे तर नऊ रस्ते का घेतले नाही.

श्री.नितीन चित्ते : बजेट करतांना मा.सभापती यांना विश्वासात घेतले काय ? काही वार्डात 80, 20 लक्ष तर काही वार्डात 5 लक्ष पर्यंत तरतूद केली. हेरीटेजवर वक्फ बोर्ड खर्च करते त्यावर 5.10 कोटीची तरतूद ठेवली. हेरीटेजची संकल्पना काय आहे.यावर खर्च वर्क्फ बोर्ड करते.यापुर्वीच हेरीटेजवर खर्च केले होते पुन्हा खर्च करण्याची गरज आहे का? शहरातील काही विकसीत कामे करण्यास कंपनी अप्रोज झालेल्या होत्या त्या बाबतीत काय प्रोसेस केली.कचरा साठी 2 कोटीची तरतूद केली सत्यम फर्टीलायझरने काय केले चौकशी झाली काय, जेथे कचरा जमा होतो तेथे कुणी तरी तपासणी करतात का ? ढोबळ पध्दतीने कचरा लिप्ट केला जातो कच-याचा खर्च 9 कोटीवरुन 36 कोटीवर जात असेल तर याकडे लक्ष दिले जात नाही. जानकीदेवी ट्रस्ट खर्च देणार होते पुढे काय कार्यवाही केली. अग्निशमन विभाग महत्वाचा 50 लक्ष तरतूद केली त्या अधिकार-यांना विश्वासात घेतले का त्या विभागात काम करण्यासाठी किती फुटाची सिडी आहे नवीन नियमानुसार शहरात 36 फुटाच्या मोठमोठया इमारती उभ्या राहत आहे. अग्निशमन दलास आवश्यक ती तरतूद करणे आवश्यक आहे. माझ्या माहिती प्रमाणे केलेली तरतूद ही योग्य नाही.या विभागाचे ऑडीट करावे.विदयुत खांब नुतनीकरणासाठी 5 कोटी ठेवले गरज आहे का या विभागाचे ऑडीट होण्याची गरज आहे. सिग्नलसाठी 1 कोटीची तरतूद केली 25 लक्ष रूपये नुकतेच महापालिकेने सिग्नलवर खर्च केले आता पुन्हा खर्च करण्याची गरज आहे का? गरज असेलच तर आऊट सोर्सींग करावे विशेष सुविधा आरोग्य केंद्र उभारणीसाठी 15 लक्ष ठेवले तापडीया डायग्नोस्टिक सेंन्टर आहे त्यांचेकडे ते काम सोपवावे सामाजिक बांधीलकी म्हणून काम करण्यास लावावे. मालमत्ता कराचे टारगेट 230 कोटी दिले हे चालू वसुलीचे टारगेट की थकबाकीसह आहे. बजेट करीत असतांना कुणाचा कुणाला ताळमेळ नाही असे वाटते. गुलमंडी, औरगपुरा रस्ता रूंद केला तो रस्ता करावा काही लोक कोर्टात गेले त्यासाठी 17 कोटी कशा अधारे ठेवले. नगररचना विभागासाठी 70 कोटीचे टारगेट कसे ठरवले मागिल वर्षी 35 कोटी आले 1000-1200 परवानगी दिली असेल कम्पीशन 200-300 झाली असतील कशाच्या अधारे टारगेट ठेवले. किती परवानगी घेतली जाईल हे माहित नाही टारेगट ठेवतांना वास्तववादी बजेट ठेवायला पाहिजे होते मा.सभापती यांना विश्वासात घेतले नाही. डांबर प्लॅन्ट साठी तरतूद नाही बीओटीचे प्रकल्प प्रलंबीत आहे त्यासाठी तरतूद केली नाही आतापर्यत झालेल्या संपुर्ण बीओटी प्रकल्पाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी करतो महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी काय कार्यवाही होत आहे. मालमत्ताचे ऑडीट करावे . 50-50 वर्षपासून गाळे धारक आहे जुनाच भाडे व कर आकारला जातो 30-35 रूपये भाडे असेल त्यात वाढ होणे अपेक्षीत आहे. मालमत्ताचे रिव्हीजन व्हावे हे बजेट ठेवत असतांना सर्व गोष्टीची शहानिशा होणे अपेक्षीत होते. 23 जानेवारी या दिनी स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नावाने मोफत अत्यंविधी योजना लागू केली. त्यासाठी तरतूद नाही योजना बंद करायची असेल तर या सभेची मान्यता घ्यावी लागेल. तरतूद ठेवायची नाही हा अधिकार प्रशासनाला कुणी दिला प्रशासनाचा कन्ट्रोल

असायला पाहिजे प्रशासनाने सादर केलेले बजेट मान्य नाही वास्तववादी बजेट असावे नावापुरते बजेट असू नये. वार्डात कामे व्हावी.जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ नये.अशी आमची मागणी आहे.

श्री.गजानन मनगटे : वार्डात कोणती विकास कामे करायची सदस्यांना विचारणा झाली परंतु पुढे कार्यवाही केली नाही.टेंडर थांबविले 15 लक्षचे सुध्दा कामे केली नाही प्रशासनाने बजेट करतांना कोणती कामे घ्यायवयाची आहे विचारणा करायला पाहिजे होती. जुने सदस्यांच्या वार्डात कामे होतात नवीन सदस्याच्या वार्डात होत नाही हे बजेट मान्य नाही 2015-16 मध्ये न झालेली कामे बजेट मध्ये घेण्यात यावीत.

श्रीमती ज्योती मोरे : अर्धवट रस्त्याची कामे केली ती पुर्ण करावी बाळकृष्ण नगर भागातील दोन कामे वगळण्यात आली.ती या बजेटमध्ये घ्यावीत.इतर कामासाठीही बजेट देण्यात यावे.

श्री.अब्दुल र नाईकवाडी : आमचे अधिकार काय असतात. 15 लक्ष प्रत्येक वार्डसाठी दिले होते कामे केली नाही.एवढया कमी रक्कमेत कामे होतात का ? ठेकेदार काम करण्यास येत नाही एजन्सी फिक्स होत नाही आम्हाला संचिकेच्या मागे फिरावे लागते.ही परीस्थिती असेल तर योग्य नाही मागिल वर्षातील कामे कमी केली ते 900 कोटीचे बजेट कुठे खर्च केले त्यातील किती रक्कम बचत आहे मागिल बजेटमधील कामासाठी तरतूद करणार काय खुलासा करावा.

श्रीमती समीना शेख : प्रत्येक वार्डासाठी समसमान बजेट असावे.

श्री.गजानन मनगटे : स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नावाने मोफत अत्यंविधी योजना लागू केली ती बंद पडत असेल तर योग्य नाही.बचत गट बंद करण्यात आले.

श्री.अब्दुल र नाईकवाडी : मागिल वर्षी 15 लक्षच्या कामाचे टारगेट दिले कामे केली नाही आता लहान रस्त्याचे डांबरीकरणासाठी 5 लक्ष देणार असे म्हटले यात कोणती काम होणार आहे.मागिल स्पीलची कामे करावी ती यात घ्यावी.

श्री.गजानन मनगटे :80 टक्के गुंठेवारी भाग येतो तेथे 90 टक्के लोक पैसे भरतात तरी ही उर्वरीत कामासाठी बजेटमध्ये तरतूद नाही.

श्री.रावसाहेब आमले :वार्ड 15 मध्ये 70 लक्षची कामे कमी केली आमचा वार्ड आजही ग्रामीण भागासाखरा वाटतो 90-95 टक्के गुंठेवारी भरली तरी कामे होत नाही काम करणार नसेल तर आम्हीच वसुली करू व कामे करून घेऊ 20 हजार लोकांची वसाहत आहे जनतेनी आम्हाला विश्वासाने निवडून दिले काम होत नसेल तर योग्य नाही दुस-या वार्डासाठी 2.25 कोटी अडीच कोटी बजेट ठेवले.आमच्या वार्डासाठीच कमी का ? ज्यांनी बजेट केले कार्यवाही करावी.नवीन वार्डात तरतूद केली नाही वार्डाच्या विकासासाठी मी स्वतःकाही पैसे खर्च केले या बजेटमध्ये आवश्यक त्या सर्व कामासाठी तरतूद करावी विकास कामे व्हावी अशी आमची मागणी आहे.

श्रीमती समीना शेख : दलित वस्ती, अल्पसंख्याक भागातील विकास करण्यासाठी भरीव तरतूद करावी.

श्री.गजानन मनगटे : 20 वार्डातच जास्त बजेट दिले बाकी वार्डात खूपच कमी बजेट दिले. सर्वांना विश्वासात घेऊन बजेट तयार केले नाही.कुठे व किती कामे करणे आवश्यकता आहे स्थळ पाहणी करून या बजेटला मंजूरी दयावी.

श्रीमती समीना शेख : जुन्या शहरातील 10-12 डीपी रस्ते आहे त्यासाठी तरतूद ठेवावी.

श्री.विकास एडके : पान क्र.11 स्पील मध्ये वार्ड अ अंतर्गत गजानन महाराज मंदिर ते रिलायन्स मॉल मुख्य रस्त्यावर 300 मी मी व्यासाची डी आय के 7 जलवाहिनी टाकणे.असे दिले ही कामे समांतर एजन्सी करणार नाही का यात कसे दिले.

श्रीमती ज्योती मोरे :सन 2016-17 च्या बजेटमधे पाणीपुरवठयाची कामे करणेसाठी तरतूद करावी सर्व वार्डात आवश्यक त्या सर्व कामासाठी समान निधी मिळावा.

श्री.मोहन मेघावाले :मा.सभापती यांना विश्वासात घेऊन बजेट केले नाही आमचे अधिकार काय असा प्रश्न पडतो प्रशासन त्यांचे अधिकारात सर्व करीत असेल तर आमची गरज काय असा प्रशन पडतो. जे उत्पन्न येते ते कुठे खर्च होते वेतनापुरती वसुली झाली म्हणजे काम संपते का ? प्रत्येक वर्षी कामे चांगली होतील असे आश्वासन दिले जाते.वसुली करावी ते होत नसेल व कामे होत नसतील तर योग्य नाही. टावर्सच्या माध्यमातून वसुली होत नाही पार्कीगच्या जागा आहे दुकाने भाडेने दिली भाडे आजही काहींना कमी आहे ते वाढवावे. मालमत्ताचा सर्वे करावा अनेक मोठमोठया इमारती झाल्या परवानगी किती दिल्या गेल्या तपासावे.उत्पन्न वाढेल मागिल काही कामे वगळली ती नवीन बजेटमध्ये असावी आवश्यक विकास कामासाठी तरतूद नाही सर्व वार्डात समान बजेट दयावे मागिल वर्षी 15 लक्षचे सुध्दा कामे झाली नाही ती पुर्ण करावी मोफत अत्यंविधी योजना चालू करावी जे गरीब आहे त्यांचेसाठी ती योजना होती कमी पैशामध्ये कसे करता येईल त्याप्रमाणे कार्यवाही करावी माहिती घेऊन सदस्यांना विचारणा करून या योजनेचा गरीबांना फायदा घेता येईल. असे नियोजन करावे व ही योजना चालू करावी यात अनेक कामाचे बजेट कमी केले.योग्य बजेट असावे.

श्री.विकास एडके : स्थायी समितीच्या सदस्यांच्या वार्डात एक्ट्रा बजेट असावे 20-30 लक्षचे कामे दिले असतील तरी ते ते सदस्य 1-1 कोटीची कामे देतील हे सर्व करण्यासाठी पैशाची गरज आहे मालमत्ता वसुली विभाग सक्षम करावा.वसुली वाढवावी प्रशासनाला प्रयत्न करण्याचे आदेशीत करावे.

श्रीमती समीना शेख : जी कामे चालू आहे ती सुध्दा यातून वगळली माझ्या वार्डातील स्पीलची 45 लक्षची ड्रेनेजचे व सिमेंन्ट क्रॉक्रीट रस्त्याचे कामे चालू आहे ती का वगळली ते आता यात घ्यावे.

या वेळी मा.आयुक्त कामा निमित्ताने सभागृहाच्या बाहेर जातात.

श्री.गजानन बारवाल : विकास कामे करणार असेल तर वसुलीकडेही लक्ष देण्याची गरज आहे ज्या ज्या गोष्टी समोर येतात त्या मा.सभापती यांना विश्वासात घेऊन करायला पाहिजे होत्या योग्य चर्चा झाली असती तर योग्य बजेट तयार झाले असते. स्थानिक स्वराज्य संस्था कराची पुर्ण वसुली करावी. अनेक मालमत्तांना कर लागलेला नाही नवीन बाधकामे झाली,शॉपीग झाले,कमर्शियल मालमत्ता वाढल्या 100 टक्के मालमत्तांना कर लावून 100 टक्के वसुली करावे ज्या रस्त्याची कामे चालू आहे ती पुर्ण करावी अनेक मालमत्ता भाडयाने दिल्या त्यांना कमी भाडे आजही आहे ते वाढवावे.पर्यटन स्थळाच्या ठिक्‍ाणी सुविधा देणे आवश्यक आहे. 52 दरवाज्याचे आवश्यक असलेले कामे करावी महिला बाल कल्याणसाठी जास्तीत जास्त बजेट दयावे मंजूर रेखांकन आहे परंतु तेथे विकास झाला नाही लोकांना बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केले परंतु अशा वसाहतीमध्ये विकास कामे केली नाही.ती करण्यात यावी.नारेगाव मध्ये जाणारा कचराची विल्हेवाट योग्य पध्दतीने लावावी त्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. रस्त्यातील खांब काढावे,सिग्नल साठी निधी आवश्यक आहे. लॅब सेन्टर असावे.आरोग्य केंद्रामध्ये सर्व सुविधा असाव्यात. शासनाचा जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न करावा. महापौर चषक क्रिडा स्पर्धासाठी

निधी असावा. गरवारे स्टेडीयम येथील सर्व सोयी सुविधा अद्यावत कराव्यात. एसटीपी प्लॅन करण्यासाठी लक्ष देण्याची गरज आहे. या समितीच्या सदस्याच्या वार्डासाठी आवश्यक ते जास्तीचे बजेट ठेवावे.

श्रीमती समीना शेख : नाले सफाई साठी छोटे मशीन खरेदी साठी तरतूद करावी.

श्रीमती कमल नरोटे : मागिल वर्षीची जुनी कामे वगळली ती वगळण्यात येऊ नये यात घेण्यात यावी. पुर्ण कामे करावीत.आमच्या वार्डात आवश्यक ते बजेट देण्यात यावे.

श्रीमती रेशमा कुरैशी : सन 2015-16 ची कामे या वर्षाच्या बजेटमध्ये घेण्यात यावीत. वर्क ऑर्डर झालेली कामे एजन्सी फिक्त केली अशी सर्व कामे करण्यात यावी.

श्री.अब्दुल र नाईकवाडी : शहर विकास म्हणून नवीन रस्ते घेतले नाही ते घ्यावे अनेक रस्त्यांचे रूंदीकरण केले अतिक्रमणे पाडली ते रस्त्याची कामे पुर्ण करावी.अल्पसंख्याक भागातील विकास कामे वगळली ती पुर्ण यात घ्यावी स्मशानभुमतीसाठी तरतूद केली कब्रस्तानसाठी ही करावी. नेहरूभवन ते औरंगपूरा रस्त्यातील ड्रेनेज लाईन महापालिका टाकणार काय यात 30 लक्ष दिले महात्मा गांधी पुतळा ते सीटीचौक पर्यत ड्रेनेज लाईन नमूद केली अशी कामे भुमिगत गटार योजनेतून होणे आवश्यक आहे बजेट मध्ये घेऊ शकतो का ? टावर्स बाबत योग्य निर्णय घ्यावा.

श्रीमती समीना शेख : 391 टावर्स आहे त्याचे जमा होणारे उत्पन्न यात दाखविले नाही

श्री.रावसाहेब आमले :नुसती चर्चा करणार वेळ जाणार बजेट बदल करण्याचे अधिकार कुणाचे होते कुणी केले.कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :सिध्दार्थ गार्डनसाठी तरतूद केली तेथील उत्पन्न किती येते ते कुठे खर्च करतो. समांतर एजन्सीला प्रति कनेक्शन मागे 1800 देतो उर्वरीत पैसे कुठे खर्च होतात.

श्री.गजानन मनगटे : सादर केलेले बजेट मध्ये आवश्यक ती तरतूद प्रशासनाने केली नाही.हे बजेट आमच्या कामाचे नाही.

यावेळी श्री.गजानन मनगटे हे सभागृहात बजेट बुक फाडतात.काही सदस्य सभागृहाच्या बाहेर निघून जातात.

श्री.गजानन बारवाल : हे प्रशासनाने ठेवलेले बजेट आहे आपल्याला दुरूस्त करण्याचे अधिकार आहे.

श्री.नितीन चित्ते : मा.सभापती यांना अधिकार आहे त्याप्रमाणे बजेट करावे. महापालिकेचा कोणताही कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जे ही पैसे असतील ते निवृत्तीच्या वेळीच मिळावे तशी तरतूदीचे स्पेशल हेड यात असावे.त्यांना वेळीच पैसे दिले जावे.

मा.सभापती : 10 मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.(सभा 12-35 वा.तहकूब पुन्हा 12.50 वा.सुरू)

श्री.गजानन बारवाल :आमचा विश्वास आहे आपण योग्य प्रकारे बजेट सादर करावे.यात दुरूस्ती करावी.

मा.सभापती : सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता मागिल वर्षीच्या बजेटमधील बरीचशी कामे झाली नाही त्यामूळे अर्थसंकल्प करतांना ते वास्तववादी व विकास कामाना चालना देणारे बजेट असावे प्रशासनाने सादर केलेले बजेटवर सदस्यांच्या भावना तीव्र आहे हे बजेट पुन्हा व्यवस्थीत सादर करण्यासाठी सुचना देण्यात येते सर्वांना न्याय मिळेल यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबर सभा तहकूब केल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी )**
नगरसचिव,
महानगरपालिका औरंगाबाद